# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

पोलीस मुख्यालय, मल्हारपेठ, सातारा
संपर्क- 02162232225 ईमेल- sp.satara@mahapolice.gov.in

दिनांक :- 11/04/2026

## प्रेसनोट

पोलीस दलामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कलागुणांना वाव देण्यासाठी पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात येते असा कर्तव्य मेळावा जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व देशपातळीवर घेण्यात येतो. दिनांक 28/03/2026 ते 03/04/2026 या कालावधीत आखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा हा नागपूर पोलीस मुख्यालय, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेला होता. सदर पोलीस कर्तव्य मेळाव्याकरीता संपुर्ण भारतातून 28 राज्य, 7 केंद्रशासित प्रदेश, सीमा सुरक्षा दल, इंडो तिबेट बॉर्डर पोलीस या सर्व क्षेत्रातील एकुण 1370 स्पर्धक सहभागी झाले होते. याकरीता सातारा जिल्हयातुन महाराष्ट्र पोलीस संघाचे प्रतिनिधीत्व पोकॉ संदिप पांडव, पोकॉ दत्तात्रय चव्हाण, पोहवा सचिन भोसले, अमोल गवळी व निखिल जाधव यांनी सहभाग घेतला होता.

सदर आखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये सांयटीफीक एड टु इन्व्हेस्टीगेशन, पोलीस फोटोग्राफी, पोलीस व्हिडीओग्राफी, घातपात विरोधी तपासणी, कॉम्प्युटर अवेरनेस व श्वानांच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात यामध्ये महाराष्ट्र पोलीस संघाने **एकूण 07 सुवर्ण, 3 रौप्य व 1 कांस्य पदके** पटकावली त्यापैकी सातारा जिल्हा पोलीस दलातील अंमलदार यांनी 1 **सुवर्ण व** 1 **कांस्य पदक** प्राप्त केले आहे. तसेच संदिप पांडव यांनी ग्राऊंड सर्च व रुम सर्च तसेच अमोल गवळी यांनी कार सर्च यामध्ये सहभागी होऊन टिमला जास्त गुण प्राप्त केले असल्याने **घातपात विरोधी तपासणी स्पर्धा** प्रकारामध्ये महाराष्ट्र पोलीस संघास **सर्वसाधारण उपविजेतेपद** प्राप्त केले आहे. यामुळे महाराष्ट्र पोलीस दलामध्ये **सातारा जिल्हा पोलीस दलाचा नांवलौकीक भारतामध्ये वाढविला आहे**.

| क्र. | स्पर्धा प्रकार | उप प्रकार | पोलीस अधिकारी अंमलदार नांव | प्राप्त पदक |
|---|---|---|---|---|
| 1. | **घातपात विरोधी तपासणी** | **व्हीआयपी रुम सर्च** | श्री.संदीप शिवाजी पांडव पोकॉ | कांस्य |
| 2. | **श्वानांच्या स्पर्धा** | **नार्कोटीक (फुड रिफुजल व ओबीडीयन्स)** | श्री.दत्तात्राय रामचंद्र चव्हाण पोकॉ<br>श्री.सचिनकुमार आबाजी भोसले पोहवा<br>श्वान- सुचक | सुवर्ण |



सदर कर्तव्य मेळाव्यातील चांगल्या कामगिरीसाठी मा.श्री.सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर, मा.श्री.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्री.हेमंतकुमार शहा, पोलीस उप अधीक्षक मुख्यालय सातारा, श्री.राजीव नवले, उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा, श्री.निलेश तांबे, पोलीस निरीक्षक सातारा तालुका पो.ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस अधीक्षक श्रीमती मनिषा डुबुले, श्वान प्रशिक्षण केंद्र पुणे, पोलीस उपअधीक्षक नेरकर, पोलीस निरीक्षक राजेश चव्हाण श्वान पथक, सातारा, पोलीस निरीक्षक अरुण देवकर स्थागुशा सातारा, पोलीस उपनिरीक्षक कडव बीडीडीएस, सातारा, श्री.संतोष शिंदे पोहवा, रंगनाथ तांबोळी, सुप्रिया किंद्रे श्वान प्रशिक्षक, घातपात विरोधी तपासणी प्रशिक्षक राखीव पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मांडके, पोलीस उपनिरीक्षक श्रीकृष्ण गवस आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

सर्व विजेते व सहभागी स्पर्धकांचे मा.श्री.सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर, मा.श्री.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्री.हेमंतकुमार शहा, पोलीस उप अधीक्षक मुख्यालय सातारा, श्री.राजीव नवले, उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा, यांनी कौतुक व अभिनंदन केले आहे.

**पोलीस अधीक्षक सातारा करीता**

**प्रति,**

**सर्व वृत्तपत्र संपादक, सातारा जिल्हा**
**सर्व मिडीया प्रतिनिधी सातारा जिल्हा**